**दिव्यांग व्यक्तीसाठींचे महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण, २०१८ ची अंमलबजावणी करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-अपंग २०१३/प्र.क्र.२०१/अ.क.२**
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २० फेब्रुवारी, २०१९

**संदर्भ**:- दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम, २०१६, दिनांक २८.१२.२०१६

**प्रस्तावना :**

भारतीय संविधानाने सर्व नागरिकांसाठी सर्वसमावेशक समाज ज्यामध्ये, दिव्यांग व्यक्ती हया अशा समाजाचा अभिन्न अंग असेल अशा समाजाची निर्मिती करणे बंधनकारक केले आहे.

२. संयुक्त राष्ट्र संघाच्या दिव्यांग व्यक्तीच्या करारावर भारत सरकारने स्वाक्षरी केली आहे. दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ हा कायदा अंमलात आला असून याद्वारे दिव्यांग व्यक्तींना समान संधी व हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा प्रदान करण्यात आलेल्या समान संधी व हक्काच्या आधारे दिव्यांग व्यक्ती राजकीय, सामाजिक, आर्थिक व स्व: विकासाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास पात्र होत असून याद्वारे दिव्यांग व्यक्तींना जीवनाच्या प्रत्येक टप्प्यामध्ये जीवन जगण्यासाठी योग्य अशा संधी उपलब्ध करुन देणेबाबत तरतुद केली आहे. महाराष्ट्र शासनाने २००१ या कृती आराखडयाची निर्मिती करणे, दिव्यांगांच्या विशेष शाळा/विशेष कर्मशाळा यांचेकरीता नवीन शाळा संहिता/कर्मशाळा संहिता तयार करणे तसेच दिव्यांग व्यक्तीच्या क्षेत्रात कार्य करणा-या स्वयंसेवी संस्थाकरीता मार्गदर्शक तत्वे तयार करुन आंतराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील विकास विषयक सर्व बाबी विचारात घेवून उक्त प्रमाणे विविध उपयोजना करुन राष्ट्रीय स्तरावरील ठरविण्यात आलेले उद्धिष्ट गाठण्याचा प्रयत्न केला आहे.

३. दिव्यांग सक्षमीकरण धोरणाचे प्रारुप तयार करण्यासाठी कोअर कमिटी स्थापन करण्यात आली होती. सदर कोअर कमिटीने दिव्यांगांच्या विविध संस्था, दिव्यांग क्षेत्रातील मान्यवर यांच्याशी चर्चा विनिमय करुन तसेच मसुद्याचे प्रारुप वेबसाईटवर प्रसिध्द करुन त्यानुसार नागरिकांच्या सुचना विचारात घेऊन दिव्यांग सक्षमीकरणाच्या धोरणाचा मसुदा माहे जुलै, २०१३ मध्ये शासनास सादर केला. सदर धोरणाच्या मसुद्यांवर मंत्रालयीन विविध प्रशासकीय विभागांचे अभिप्राय मागविण्यात आले. तसेच सर्व प्रशासकीय विभागांच्या सचिवांची बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये मंत्रालयीन विविध प्रशासकीय विभागांनी (वित्त विभागासह) दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियमातील त्यांच्याशी संबंधित मुद्यांबाबत सहमती दर्शविली आहे. सदर दिव्यांग धोरणाचा मसुदा दिव्यांग हक्क कायदा २०१६ नुसार सुधारणा करुन आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी दि.१९.०४.२०१७ रोजी वेबसाईटवर प्रसिध्द करुन धोरणाच्या मुद्यांबाबत नागरिकांच्या सूचना व

हरकती घेण्यात आल्या. नागरिकांकडून व संबंधित प्रशासकीय विभागांकडून स्वीकृत करावयाच्या सूचना तथा अभिप्रायानुसार धोरणाचा अंतिम मसुदा तयार करण्यात आला. सदर धोरणास दि.२९.११.२०१८ रोजी मा. मंत्रीमंडळाने मान्यता दर्शविलेली आहे. मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने पुढील प्रमाणे महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग व्यक्तीसाठीचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

**शासन निर्णय** :

४. या शासन निर्णयाद्वारे दिव्यांग व्यक्तींसाठीचे राज्याचे दिव्यांग धोरण २०१८,घोषित करण्यात येत असून, त्याची अंमलबजावणी करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. यामध्ये पुढील बाबी समाविष्ट राहतील :-

(१) आरोग्य व तत्सम यंत्रणेमार्फत दिव्यंगत्व येण्यास प्रतिबंध, दिव्यंगत्वाचे शीघ्र निदान आणि विकासातील विलंबता व दिव्यंगत्व या बाबतीत त्वरित हस्तक्षेप करणे,
(२) शिक्षण,
(३) प्रशिक्षण व रोजगार,
(४) दिव्यांग व्यक्तींना सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने पुनर्वसन सेवा,
(५) दिव्यंगत्व प्रमाणपत्र आणि आरोग्य विमा,
(६) अडथळा मुक्त वातावरण व सुगम्यतेचा अधिकार,
(७) साधने व उपकरणे, सहाय्यक साधने व त्यांची काळजी व देखभाल,
(८) कायदेशीर क्षमता व पालकत्व,
(९) स्वसमर्थन आणि दिव्यांग व्यक्ती संघटना,
(१०) उच्च आधाराची गरज असणाऱ्या अपंग व्यक्तींच्या बाबतीत विशेष तरतूदी आणि प्रत्यक्ष लाभ बँक खात्यात थेट जमा होण्याची योजना,
(११) औद्योगिक सामाजिक जबाबदारी,
(१२) सामाजिक संरक्षण,
(१३) खेळ करमणूक आणि सांस्कृतीक कार्यक्रम,
(१४) दिव्यांग मुली व दिव्यांग स्त्रीयांसाठी विशेष तरतूदी,
(१५) नियोजन व अंदाजपत्रकीय तरतूद,
(१६) सनियंत्रणाची पध्दती,
(१७) योजनांचे नियोजन व सनियंत्रण करण्याच्या दृष्टीने आवश्यक आधारभूत माहिती,
(१८) राज्य अपंग (दिव्यांग) कल्याण आयुक्त, कार्यालय.

५. सदर धोरणात समाविष्ट उपरोक्त बाबींचा तपशील सोबतच्या "परिशिष्ठ-अ" मध्ये दिला आहे.

६. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनुसार विषयानुरुप त्या-त्या विषयाशी संबंधित प्रशासकीय विभागाद्वारे विविध योजना /कार्यक्रम आखुन त्यावर स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात येतील व त्यासाठी संबंधित विभाग आवश्यकतेनुसार त्या त्या विभागाच्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद करेल.

७. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्कतेनुसार विषयानुरूप विविध स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपालिका/नगरपंचायती, जिल्हापरिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत इ.) विविध योजना/कार्यक्रम तयार करतील व त्यासाठी त्यांचे निधीतुन (५ टक्के) त्यांचे अर्थसंकल्पात पुरेशा निधीची तरतुद करतील.

८. शासनाच्या सध्या सुरु असलेल्या दिव्यांगविषयक कार्यक्रम/उपक्रम/योजना पूर्ववत सुरु राहतील.

९. सदर धोरण पथदर्शक असून त्यांत आवश्यकतेनुसार बदल वेळोवेळी मा. मुख्यमंत्री स्तरावरील मान्यतेने करण्यात येतील.

१०. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. अ.स.क्र.९९/२०१८/व्यय-१४ दि.०७.०३.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२११३०६४६०६२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:32:08 +05'30'

**(दिनेश वाघमारे)**

**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति**.

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा. मुख्यमंत्राचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई.
३. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद , विधानमंडळ, मुंबई.
४. मा. मंत्री सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव.
५. मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव.
६. सचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य् विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
८. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
१०.महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
११.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.वित्त विभाग (व्यय-१४), मंत्रालय, मुंबई.
१३.निवड नस्ती (अपंग कल्याण-१, अपंग कल्याण-२)

# परिशिष्ठ – अ

## महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण – २०१८.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | | | **महाराष्ट्र शासनाच्या दिव्यांग व्यक्तीच्या राज्य धोरणाची उद्दिष्टे:-**<br>अ) राज्य शासन दिव्यांग व्यक्ती संबंधित सर्व कायदे, नियम व घटनात्मक तरतुदी यांची सुलभ व परिणामकारक अंमजबजावणी करेल.<br>आ) राज्य शासन सर्व दिव्यांग व्यक्तीकरीता खात्रीने दिव्यांगत्वाचे शीघ्र निदान, दिव्यांग विदयार्थ्यांकरिता सर्व समावेशित शिक्षण, कौशल्य विकास, स्वयंरोजगार व रोजगाराच्या योग्य संधी, दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे व दिव्यांग व्यक्तीची न्यायिक क्षमता वृध्दिगंत होण्याच्या दृष्टीने राज्य शासनाच्या विविध विभागांशी परिणामकारक बहुविध समन्वय विकासाच्या पध्दतीची अंमलबजावणी करेल.<br>इ) राज्य शासन विविध विभागांमार्फत आवश्यक ती अर्थसंकल्पीय तरतुद मंजुर करुन अशी तरतुद योग्य त्या प्रमाणात दिव्यांग व्यक्तींचे सक्षमीकरण होण्याच्या दृष्टीने नियतव्यय म्हणून राखुन ठेवेन.<br>ई) राज्य शासन दिव्यांग व्यक्तींना परिणामकारकरित्या सेवा पुरविण्याच्या दृष्टीने सुयोग्य अशी नियंत्रण करण्याची पध्दत विकसित करेन.<br>उ) राज्य शासन दिव्यांग व्यक्तींना त्यांचे सार्वजनिक जीवनाच्या प्रत्येक टप्प्यामध्ये व त्यांना पुरविण्यात आलेल्या सेवांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव करणार नाही, दिव्यांग व्यक्तींची पिळवणूक होवू देणार नाही व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवणार नाही.<br>ऊ) राज्य शासन कौटुंबिक कलाहामुळे अथवा समाजाने बहिष्कृत केल्यामुळे बाधित झालेल्या व उच्च आधाराची गरज असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींची काळजी घेण्याच्या दृष्टीने योग्य ती उपाययोजना करेल.<br>ए) राज्य शासन या धोरणामध्ये सध्या सुचविण्यात आलेल्या बाबी तसेच भविष्यात घेण्यात येणाऱ्या निर्णयातही जीवनचक्र दृष्टीकोनाचा अंगीकार करुन दिव्यांग व्यक्तींचे कल्याणासाठी नियोजन करेल. दिव्यांग व्यक्तीसाठी राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमामध्ये गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ती अधिसूचना राज्य शासन निर्गमित करेल. |
| २) | | | **आरोग्य व तत्सम यंत्रणेमार्फत दिव्यांगत्व येण्यास प्रतिबंध, दिव्यांगत्वाचे शीघ्र निदान आणि विकासातील विलंबता व दिव्यांगत्व या बाबतीत त्वरित हस्तक्षेप करणे :-** |
| | (i) | | **प्रसुती झाल्या नंतर नवजात बालकाचे विकासात झालेल्या विलंबाचा प्रतिबंध करणे :-**<br>जन्माला येणाऱ्या नवजात बालकांच्या विकासामध्ये विलंब होणे ही बाब सार्वत्रिक असून त्यांच्या बाबतीत प्रसुतीपूर्व काळजी घेवून दिव्यांगत्व येण्यास प्रतिबंध करता येईल. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:32:25 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | **अ.** | त्यानुसार आरोग्य विभागामार्फत खालील रुग्णालये व कार्यक्रमामध्ये गर्भवती मातेची काळजी, प्रसुतीपूर्व काळजी, प्रसुती दरम्यान सेवा आणि प्रसुती दरम्यान काळजी यामध्ये सुधारणा करण्यात येवून संबंधित रुग्णालय व कार्यक्रमामध्ये दर्जावाढ करण्यात येईल.<br>१. प्राथमिक आरोग्य केंद्र<br>२. ग्रामीण रुग्णालये<br>३. उप जिल्हा रूग्णालये<br>४. जिल्हा रूग्णालये<br>५. राष्ट्रीय आरोग्य योजनेंतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवक, प्रसुती दरम्यान कार्य करणारी दाई इ. |
| | | **ब.** | प्रसुतीपूर्व काळात/प्रसुती दरम्यान व प्रसुती नंतरच्या काळात जे घटक दिव्यांगत्व येण्यास कारणीभूत ठरत असतील अशा घटकांच्या बाबतीत व्यापक प्रमाणात विविध माध्यमांव्दारे प्रसिध्दी देवून जनजागृती करण्यात येईल. |
| | | **क.** | प्राथमिक रुग्णालयामार्फत ग्रामीण भागातील गरोदर स्रियांना मोफत जीवनसत्व, लसीकरण व  तत्सम आवश्यक सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने जनजागृती करण्यात येईल. |
| २ | (ii) | | **विकासास विलंब झालेल्या  नवजात शिशुंचे  व लहान मुलांचे लवकर निदान :-** |
| | | | सर्वसाधारणपणे १० टक्के लहान वयातील मुलांमध्ये विकासास विलंब आढळतो. (राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कल्याण कार्यक्रमाच्या कार्यालयीन नोंदीनुसार) विकासास विलंब झाल्यास व त्यावर त्वरीत हस्तक्षेप न झाल्यास, मानसिक/ आकलनविषयक, श्रवण वा दृष्टीसंबंधित विकलांगता येऊन कायमस्वरूपी दिव्यांगत्व येऊ शकते. त्यानुसार आरोग्य व तत्सम विभागाच्या यंत्रणेमार्फत खालील उपाययोजना करण्यात येतील. |
| | | **अ.** | विकासास विलंब झालेल्या नवजात शिशू व लहान मुलांचे त्वरित  निदानासाठी व निदान करण्याचे व्यवस्थापनासाठी, आशा कामगार, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी, शिक्षण विभागाचे शिक्षक , विशेष शाळा शिक्षक यांच्यामार्फत विलंबाने विकास होणाऱ्या मुलांमध्ये अधिक तीव्र दिव्यांगत्व निर्माण होण्यास प्रतिबंध करण्यासाठी जिल्हा त्वरीत  हस्तक्षेप केंद्रांद्वारे (DEIC) जनजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करेन. तसेच राज्य शासन आरोग्य तथा तत्सम विभागामार्फत आशा, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी यांना दिव्यांग बालकांची चाळणी करिता आवश्यक ते प्रशिक्षण देईल. |
| | | **ब.** | त्वरीत हस्तक्षेपाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेसंबंधी समुदायामध्ये जनजागृती केली जाईल. दिव्यांग मुलांच्या माता किंवा त्यांचे काळजी घेणारे काळजी  वाहक यांना घरगुती उपचार देण्यासाठी प्रशिक्षित करण्यात येईल. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:32:38 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | **क.** | समुदाय जागृती कार्यक्रम विषयक प्रशिक्षण देण्याकरिता दिव्यांग व्यक्तीकरिता असलेल्या राष्ट्रीय संस्थांची आवश्यकतेनुसार मदत घेतली जाईल. |
| | | **ड.** | त्वरित हस्तक्षेप व निदान अंतर्गत आवश्यक तो शस्त्रक्रियात्मक हस्तक्षेप आणि प्रत्यारोपणाची प्रकरणे याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थामधील दिव्यांग व्यक्तीकरिता संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेने राखीव ठेवलेल्या ५ टक्के निधीतून आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाईल. |
| २ | (iii) | | **शिघ्र हस्तक्षेप /उपचारविषयक सेवांची उपलब्धता व या विषयक जनजागृती निर्माण करणे :-** |
| | | | महाराष्ट्रात निमशहरी व ग्रामीण भागात दिव्यांगत्वाचे उपचार करणारे व्यावसायिक / तज्ञ व्यक्ती यांची संख्या मर्यादित असल्यामुळे संभाव्य दिव्यांगत्व येण्याचे टाळण्याच्या दृष्टीने शिघ्र निदान करण्यास मर्यादा येतात. त्यानुसार आरोग्य व तत्सम विभागाच्या यंत्रणेमार्फत जनजागृती विषयक खालील उपाययोजना करण्यात येतील. |
| | | **अ.** | जिल्हा रुग्णालयातील विविध उपचारतज्ञांच्या मार्गदर्शनाखाली समुदाय कार्यकर्ते, माता आणि काळजीवाहक यांना बाह्य बहुउपचारात्मक उपचार करणारे सेवक म्हणून काम करण्यास आवश्यक प्रशिक्षण देण्यात येईल. जिल्हा दिव्यांगत्वाचे शीघ्र निदान करणाऱ्या केंद्राच्या सहकार्याने राज्य शासन आरोग्य तथा तत्सम विभागामार्फत निमशहरी व ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या निमवैद्यकीय व आरोग्य कर्मचारी यांना दिव्यांगत्वाचे शीघ्र निदान करणेविषयक प्रशिक्षण देईल. स्वयंसेवी संस्था व समाजातील सामान्य नागरिक यांचे मदतीने शीघ्र हस्तक्षेप सेवा विषयक श्रृंखलेची व्यापक प्रमाणात निर्मिती करण्यात येवून दिव्यांगत्वाचे त्वरीत निदान व हस्तक्षेप याद्वारे दिव्यांगत्वाचे प्रमाण कमी होणे अथवा दिव्यांगत्व येण्यास प्रतिबंध होणे या विषयक सार्वजनिक जनजागृती निर्माण केली जाईल. |
| | | **ब.** | राज्य शासन आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग, शालेय शिक्षण विभाग तथा तत्सम विभागामार्फत प्रारंभीच्या वर्षामध्ये बालकांना वेळोवेळी पुरविण्यात येणाऱ्या व लाभदायक असलेला पोषक आहार देण्यास प्रोत्साहन देईल. तसेच स्तनपान, जलचिकित्सा, मालिश, योग्य त्या प्रमाणात पोषक आहार व नवजात शिशुचे बाबतीत जन्म झाल्यानंतर शारिरीक व मानसिक विकास होण्याच्या दृष्टीने माता व बालक यांच्यातील भावनिक देवाणघेवाण यांस देखील प्रोत्साहन देईल. दिव्यांग बालकाच्या विकासातील टप्प्यांचा व सामाजिक ,बौध्दिक कौशल्याचा विकास होण्याच्या दृष्टीने शारिरीक व्यायाम जसे योग साधना, नृत्य, ताल नृत्य, पोहणे, नियमित शारिरीक शिक्षण यास देखील राज्य शासन प्रोत्साहन देईल. |
| | | **क.** | सार्वजनिक आरोग्य विभाग तथा तत्सम विभागामार्फत हिमोफिलिया आणि थैलेसिमिया या आजारावरील उपचाराकरीता प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये एक स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात येईल. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:32:52 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | ड. | दिव्यांगत्वाचे त्वरीत निदान व शीघ्र हस्तक्षेप होण्याच्या दृष्टीने घरगुती उपचारावर आधारित पध्दत, दिवसा काळजी घेणारी केंद्रे, व दिव्यांग बालकाचा सांभाळ करण्यासाठी मातेचा किंवा काळजी वाहकाचा समावेश या प्रकारच्या पध्दतींचा उपयोग करुन संभाव्य दिव्यांगत्व दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. |
| ३) | | | **शिक्षण :-** |
| | (i) | | **सर्व समावेशित शिक्षण :-** राज्य शासन शालेय शिक्षण व क्री डा विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तथा तत्सम विभागामार्फत दिव्यांग मुलांच्या समावेशित शिक्षणाला प्राधान्य देईल आणि केवळ बौध्दिक व मानसिक प्रकारातील दिव्यांग व्यक्तींना तसेच उच्च आधाराची गरज असलेल्या दिव्यांगाच्या बाबतीत विशेष शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| | | अ. | सर्व शिक्षा अभियानाद्वारे समावेशित शिक्षणावर भर देऊन दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच एकंदरीत व्यक्तिमत्व विकास होण्याची विशेष सुविधा दिव्यांग विदयार्थ्यांना उपलब्ध करुन दिली जाते. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकामध्ये एक विशेष जनजागृती मोहिम राबविली जावून सर्व शिक्षा अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येईल. |
| | | ब. | दिव्यांग विदयार्थ्यांना शिक्षण घेत असताना शाळेमध्ये कोणत्याही प्रकारे भेदभावास किंवा अडथळा निर्माण होणार नाही, यासाठी राज्य शासनाचा शालेय शिक्षण विभाग योग्य ती काळजी घेईल. याकरिता शाळेतील सामान्य विद्यार्थी, शिक्षक, शाळेचे व्यवस्थापन व प्रशासन यांच्यामध्ये जाणीव जागृती संबंधित शाळा करतील. दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार पुरेशा प्रमाणात शाळांमध्ये प्रवेश देण्यात येईल. |
| | | क. | राज्य शासन सर्व शासकीय, अनुदानित आणि खाजगी शाळा यातील सर्व कार्यरत शिक्षकांना आवश्यक प्रशिक्षण देईल. राज्यातील प्रत्येक शाळा गटासाठी विशेष शिक्षण देणाऱ्या शिक्षकांना नेमण्यात येईल. या शिवाय शिक्षकांकडून दिव्यांग विद्यार्थ्यांची गरज व मागणीनुसार त्यांना शिक्षण देण्यात येईल. या विशेष शिक्षकांचे मदतीसाठी स्वयंसेवी तत्वावर पालकांची/समुदाय कार्यकर्ते यांची मदत घेण्यात येईल. |
| | | ङ | भारतीय पुनर्वास परिषद नवी दिल्लीद्वारे (RCI) मान्यता प्राप्त मुक्त व दूरशिक्षणाव्दारे नियमित शाळातील शिक्षकांना अध्ययन करण्यास प्रोत्साहन दिले जावून अशा शिक्षकांना दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यास प्रवृत्त केले जाईल. |
| | | इ. | दिव्यांग विद्यार्थ्यांना आवश्यक व योग्य असा शैक्षणिक आधार/साधने सर्व शिक्षा अभियानातर्गत राज्य शासन पुरवेल. उदा. शैक्षणिक आधार, आधारभुत वर्ग खोल्या, शैक्षणिक सुविधा मिळण्याकरीता सुलभता परिक्षेसाठी लेखनिक आणि जादाचा वेळ, अभ्यासक्रमाची जुळवाजुळव, कृत्रिम अवयव व साधने पुरविणे इ. |
| | | ई. | राज्य शासन धोरण अंतिम होवून प्रसिध्द झाल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीचे आत जनतेमध्ये जनजागृती कार्यक्रमाद्वारे संवेदना जागृत करेल. तसेच दिव्यांग व्यक्ती विषयक सुयोग्य अशा प्रकरणाचा समावेश प्राथमिक व माध्यमिक विभागास शिकविल्या जाणाऱ्या पाठयपुस्तकांमध्ये करेल. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:33:06 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | उ. | राज्य शासन दृष्टीदोष असलेले, अल्प दृष्टिवान, कर्णबधिर, चलनवलन संबंधीत दिव्यांगत्व असलेले ,सौम्य बौध्दिक अक्षमता असलेले, अधिक कार्यक्षम स्वमग्न, मंद अध्ययन क्षमता/ गतीमंद, अध्ययन अक्षमता, आणि मेंदूचा पक्षाघात असलेले विद्यार्थी यांना त्यांच्या क्षमतांचा अधिक विकास करण्यासाठी व त्यांना समान शैक्षणिक संधी देण्यासाठी यांच्या समावेशित शिक्षणास प्रोत्साहन देईल. यासाठी आवश्यकतेनुसार पालक व समाज सेवक यांच्या सेवांचा उपयोग करुन घेतला जाईल. |
| ३. | (ii) | | **दिव्यांगाच्या विशेष शाळा व कार्यशाळा याद्वारे विशेष शिक्षण :-** |
| | | | दिव्यांग व्यक्तींना सर्व सामान्य स्थितीत समावेशित शिक्षण प्राप्त करण्यासाठी अडचणी निर्माण होत असतील तेथे दिव्यांग विदयार्थ्यांना मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ च्या तरतुदीनुसार विशेष शिक्षण दिले जाईल. बौध्दिक दिव्यांगत्व, स्वमग्न आणि बहुदिव्यांगत्व असलेल्या, अधिक मदतीची गरज असलेल्या, मुलांना विशेष शिक्षण दिले जाईल त्यात त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्याच्या दृष्टीने विविध कामे करण्यात निपूणता, त्यांच्या वर्तनात्मक व भावनात्मक गरजा, वैयक्तिक हालचाल व समुदायाची मदत यावर अधिक भर देण्यात येईल. उद्दिष्ट असे असेल की बौध्दिक दिव्यांगत्व असलेली मुले वा अतिरिक्त मदतीची गरज असलेली मुले यांना मदत करुन त्यांची अधिकाधिक क्षमता वाढवून सर्वांसाठी शिक्षण असा त्याचा गर्भितार्थ काढणे. |
| | | **अ.** | विशेष शाळांना विशेषतः अंध, कर्णबधिर आणि मेंदूच्या विकासासंबंधीत दिव्यांगत्व असलेल्या मुलांना मुख्यप्रवाहातील सर्वसाधारण शाळेत समावेशित शिक्षणासाठी शाळापूर्व प्रशिक्षण देण्यास प्रोत्साहन दिले जाईल. विशेष शाळेने यशस्वीरित्या समावेशित शिक्षणासाठी पाठवलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येवर शाळेच्या कामगिरीसंबंधी निर्णय घेतला जाईल. |
| | | **आ.** | कमी कार्यात्मक स्तर असलेल्या मुलांचे शिक्षण विशेष शाळेतच पुढे सुरू राहील. त्यासाठी राज्य सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्यांतर्गत आवश्यक सुविधा प्रदान करेल. विशेष शाळेत कार्यात्मक साक्षरता कौशल्ये, व्यवसायपूर्व कौशल्ये यांचा विकास आणि राजीव गांधी मुक्त शाळेमार्फत १०वी पर्यंत शालेय शिक्षण पूर्ण करण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला जाईल. |
| | | **इ.** | सर्व वसतीगृहात्मक विशेष शाळांमध्ये आणि अनुदानित विशेष शाळांमध्ये गरजू दिव्यांग, अनाथ दिव्यांग, पालकांकडून दुर्लक्षित दिव्यांग, बौध्दिक दिव्यांगत्व असलेली, स्वमग्न, बहुदिव्यांगत्व असलेली आणि अधिक मदतीची गरज असलेली दिव्यांग अशा सर्व दिव्यांग मुलांना प्रथम प्राधान्याने प्रवेश दिला जाईल. |
| | | **ई.** | लवकर दिव्यांगत्वाचे निदान झालेल्या ५ वर्षाखालील ज्या मुलांना लहान वयातील विकासाच्या कालखंडात /अवस्थेत त्यांच्या मज्जातंतूंची लवचिकता लक्षात घेऊन आवश्यक प्रशिक्षण देण्याची व लवकर उपचाराची /हस्तक्षेपाची गरज आहे अशा |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:33:19 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | | दिव्यांग मुलांना त्यानंतर प्राधान्य दिले जाईल. त्यांचे विशेष शाळेत येणे अधिक सुविधाजनक होण्यासाठी सोईच्या डे-केयर मॉडेल शाळेला प्राधान्य दिले जाईल. यामध्ये दिव्यांग मुलांच्या मातांना दिव्यांग मुलांबरोबर शाळेत येण्यास प्रोत्साहन दिले जाईल. दिव्यांग मुलाच्या शिक्षणप्रक्रियेत माता व पालकांना आवश्यकतेनुसार प्रशिक्षण दिले जाईल. <br> ज्या विना अनुदानित संस्थां देणग्यांचा किंवा उद्योगांची सामाजिक जबाबदारी (CSR-Corporate Social Responsibility) अंतर्गत मिळालेल्या निधीचा वापर करून वा स्वतःच्या खर्चाने विशेष शाळा चालवण्यास उत्सुक आहेत त्यांना शाळा चालवण्यास राज्य शासन प्रोत्साहन देईल आणि त्यांची कामगीरी आणि गुणवत्ता यांचे परीक्षण करेल. |
| | | **उ.** | राज्य शासन संकेतस्थळावर राज्यात विशेष शिक्षणासाठी उपलब्ध सुविधा व राज्यातील समावेशित शिक्षण संसाधने याची माहिती प्रकाशित करेल. |
| | | **ऊ.** | कर्णबधिर मुलांना सांकेतीक भाषा सार्वत्रिकपणे सहज वापरता येईल. भारतीय सांकेतिक भाषा संप्रेषणाचे माध्यम आणि अध्यापनासाठी शिक्षणाचे माध्यम म्हणून स्विकारू शकतील. पाच वर्षाखालील कर्णबधिर मुलांनी श्रवणयंत्रासह बोलण्यास शिकणे व त्यानंतर वाचन व लेखन कौशल्ये त्यांच्या वयाच्या सामान्य मुलांच्या बरोबरीने विकसित करून घेणे यासाठी सर्व प्रयत्न केले जातील ज्यामुळे त्यांना समावेशित शिक्षणात सहज व लवकर पाठवता येतील. |
| | | **ए.** | विशेष शिक्षणाच्या सुविधांचे प्रत्येक जिल्ह्यात समान वितरण होण्यासाठी राज्य जनगणनेच्या व विशेषत: दिव्यांग व्यक्तींच्या विस्तृत आकडेवारीवर आधारीत एक प्रमुख नियोजन आराखडा तयार करेल. हा प्रमुख नियोजन आराखडा राज्यातील जिल्ह्यात अनुदानीत विशेष शाळांना मान्यता देणे व संसाधन शिक्षकांच्या नियुक्तीसाठी आधार मानला जाईल. |
| | | **ऐ.** | कौशल्य विकसन, निवास व पुनर्वसन यातील आवश्यकतेनुसार बदल लक्षात घेऊन दिव्यांगाच्या विशेष कार्यशाळांमध्ये सुधारणा करण्यात येवून राज्याच्या बृहत आराखड्या मध्ये सुधारणा विषयक बाबींचा समावेश करण्यात येईल. |
| | | **ओ.** | प्रत्येक विभागात प्रमुख दिव्यांगत्वाचे प्रतिनिधित्व करणारी एक आदर्श शाळा/कार्यशाळा स्थापन करण्यात येईल. या शाळांना सर्वोत्तम शाळा / कार्यशाळा बनण्यासाठी शासन मदत करेल. |
| ३. | (iii) | | **उच्चशिक्षण :** |
| | | | राज्य शासन दिव्यांगत्व असलेल्या मुलांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यास उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, कृषी विभाग तथा तत्सम विभागामार्फत आवश्यक त्या उपाययोजना करेल. |
| | | | शिक्षणाच्या प्रवाहात दिव्यांगत्व असलेल्या मुलांच्या उच्च शिक्षणाच्या आवश्यकतेनुसार राज्य शासन सर्व समावेशक आवश्यक योजनांचा अंतर्भाव करेल. राज्यातील सर्व |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:33:31 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | | विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये दिव्यांगत्व असलेल्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी आवश्यक संसाधने व उपकरणे असतील. |
| | | अ. | केंद्र शासनाच्या दिव्यांग हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम ३२ अन्वये :-<br>१. शासकीय उच्च शिक्षण संस्था (तंत्रशिक्षण,वैद्यकीय शिक्षणासहित) व ज्या संस्थांना राज्य शासनाकडून सहाय्य मिळते अशा संस्थामध्ये लक्षणीय (benchmark) दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींना ५ % जागा राखीव राहतील.<br>२. उच्च (तंत्रशिक्षण,वैद्यकीय शिक्षणासहित) शिक्षणासाठी संस्थामध्ये प्रवेश घेण्यासाठी लक्षणीय (benchmark) दिव्यांग असणाऱ्या व्यक्तींना सर्व साधारण व्यक्तीपेक्षा पाच वर्षे अधिक वयोमर्यादा राहील. |
| | | आ. | राज्य शासन जे विद्यापीठ विभाग किंवा महाविद्यालये शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम राबवतात, त्यांना शासन दिव्यांगत्व असलेल्या मुलांबरोबर काम करू शकणारे शिक्षक निर्माण करण्यास प्रोत्साहन देईल. अभ्यासक्रमास जास्तीत जास्त युवकांनी प्रवेश घ्यावा म्हणून या अभ्यासक्रमास व्यापक प्रसिध्दी देईल. |
| | | इ. | राज्याच्या सर्व विद्यापीठात स्वतंत्र दिव्यांगत्व अध्ययन केंद्र स्थापन करण्यात येतील. ह्या केंद्रात विविध शिक्षण प्रवाहातील पदव्युत्तर पाठ्यक्रम त्याचबरोबर संशोधन व विकास कार्य ही आयोजित केले जाईल व अतिउच्च शिक्षण एम.फिल, पी.एच.डी इत्यादी शिक्षण घेण्यासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात येईल. |
| | | ई. | शहरी व ग्रामीण भागातील दिव्यांगत्व असलेल्या मुलांच्या उच्च शिक्षणास (तंत्रशिक्षण,वैद्यकीय शिक्षणासहित) प्रोत्साहन व विकास करण्यासाठी राज्यातील शासकीय, अनुदानित विद्यापीठ व महाविदयालय संलग्न व स्थानिक स्वराज्य संस्था यांचे निवासी वसतीगृहात दिव्यांगत्व असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ५ टक्के राखीव जागा ठेवण्यात येतील. |
| ३. | (iv) | | **शिक्षणातील इतर नियमात्मक मुद्दे :-** |
| | | अ. | **राज्य सरकारकडून प्रदान केल्या जातील अशा सुविधा :-**<br>१. मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या कलम २१ अनुसार शाळा व्यवस्थापन समितीतील सदस्यांमध्ये दिव्यांग मुलांचे कमीत कमी एक पालक वा काळजीवाहक/संरक्षक यांची नियुक्ती केली जाईल.<br>२. दिव्यांग मुलांना शाळेत प्रवेश, उपस्थिती, त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सुनिश्चित करून त्यावर देखरेख ठेवण्यात येईल.<br>३. वर्गातील दिव्यांग मुलांच्या सामान्य गरजा समजणे व पूर्ण करणे यासाठी प्रत्येक शिक्षकाला सज्ज करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमात आवश्यक धड्यांचा/भागाचा समावेश करेल.<br>४. दिव्यांग मुलांना पदवीपूर्व व पदव्युत्तर अभ्यासक्रमात सर्व सामान्य आणि आरक्षण श्रेणीमध्ये आडव्या पद्धतीने (parallel reservation) ५ टक्के आरक्षण दिले जाईल.<br>५. उच्च (तंत्रशिक्षण,वैद्यकीय शिक्षणासहित) शिक्षणासाठी दिव्यांगांना फीमध्ये सवलत मिळेल. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:33:47 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | | | **प्रशिक्षण व रोजगार :-** |
| | (i) | | **कौशल्य विकास व मूल्य निर्धारण :-** |
| | | | राज्य शासन कौशल्य विकास विभाग तथा तत्सम विभागामार्फत विद्यमान कौशल्य विकसन केंद्रांच्या एकीकरणाच्या माध्यमातून कौशल्य विकसनासाठी सुविधा पुरवेल. ज्या ठिकाणी अशी केंद्रे उपलब्ध नसतील तेथे दिव्यांग व्यक्तीसाठी, विशिष्ट प्रकारचे दिव्यांगत्व असलेल्या मुलांसाठी कौशल्य विकसन केंद्र स्थापन करेल. |
| | | **अ.** | ग्रामीण भागातील दिव्यांग व्यक्तींसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी कौशल्ये विकसन केंद्रे असतील. या केंद्रांमध्ये कृषी व्यवसाय, स्थानिक व्यवसाय यासंबंधी कौशल्यांचे प्रशिक्षण दिव्यांगांना देऊन त्यांच्यातील सर्जनशिलतेला प्रोत्साहन दिले जाईल. |
| | | **आ.** | कौशल्य निर्माण अभ्यासक्रम उद्योग प्रेरित अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र यावर आधारित असतील तसेच ते स्वयंरोजगारासही सहयोग देतील. हे रोजगारोन्मुख ई-लर्नींग अभ्यासक्रम दिव्यांग मुलांपर्यंत सार्वत्रिक/सार्वजनिक माहिती तंत्रविज्ञान /आय टी व्यासपीठाद्वारे पोहोचू शकतील. |
| | | **इ.** | शासन अशासकीय संस्थांना बौध्दिक दिव्यांगत्व किंवा स्वमग्नता असलेल्या व्यक्तींसाठी व्यवसाय प्रशिक्षण आणि कौशल्य निर्माण केंद्र चालवण्यास प्रोत्साहन देईल. ही केंद्रे त्यांच्या प्रशिक्षणार्थींमध्ये संस्थाधारित कार्यशाळा वा मार्गदर्शकांच्या मदतीने उपलब्ध खुले रोजगार यासाठी आवश्यक व्यावसायिक कौशल्ये, व्यावहारिक कौशल्ये व भावनात्मक कौशल्येही निर्माण करतील. खुले रोजगार उपलब्ध करून देणा-या मार्गदर्शकांना कौशल्य निर्माण योजनेचा एक भाग मानले जाईल. या मार्गदर्शकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम विकसित केले जातील. |
| | | **ई.** | प्रत्येक प्रकारच्या दिव्यांगत्वासाठी दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या कौशल्य परिषदेने नमूद केलेल्या कौशल्ये निर्माण अभ्यासक्रम चालवणाऱ्या अशासकीय संस्थांचे मूल्यनिर्धारण करण्यास राज्य मदत करेल. हे मूल्यनिर्धारण व्यवसाय शिक्षण देणा-या व कौशल्ये निर्माण कार्यक्रमात सहभागी निवडक शासकीय संस्थांद्वारे केले जाईल. |
| | | **उ.** | बौध्दिक दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्ती आणि अधिक मदतीची गरज असलेले दिव्यांग व्यक्तीसाठी व्यवसाय प्रशिक्षण केंद्रांमध्ये प्रशिक्षण घेण्यास कोणतीही वयोमर्यादा असणार नाही. अधिक मदतीची आवश्यकता असलेल्या व्यक्ती प्रतिष्ठेने दैनंदिन जिवन जगता यावे म्हणून आवश्यक कौशल्ये संपादन करण्यासाठी प्रशिक्षण चालूच ठेवतील. |
| | | **ऊ.** | शासनांतर्गत कौशल्य विकास तथा तत्सम विभागामार्फत औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये (ITI) व्यवस्थेत दिव्यांगांसाठी कौशल्य विकास कार्यक्रमांना प्रोत्साहन दिले जाईल आणि येण्याजाण्यासाठी शक्यतो वाहतुक व्यवस्था प्रदान केली जाईल. केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे उपलब्ध असलेली सर्व सवलत प्रदान केली जाईल. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:34:00 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | ए. | शासन दिव्यांग व्यक्तीच्या प्रशिक्षण व पुढील रोजगार यासाठी आद्योगिक संस्थांशी सहकार्य करेल. कौशल्य विकासाच्या गतिविध्यांमध्ये समन्वय करण्यासाठी महाराष्ट्र कौशल्य विकास संस्था तसेच राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ यांची मदत घेतली जाईल. |
| ४. | (ii) | | **रोजगार :-** |
| | | | दिव्यांग व्यक्तींची प्रतिष्ठा, आत्मविश्वास व सन्मान मिळवून देण्याचे रोजगार हे उत्तम साधन आहे त्यामुळे शासन शासकीय तथा निमशासकीय सेवेत दिव्यांग व्यक्तींना समान संधीची हमी देईल. यासंदर्भात शासनाच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत (सामाजिक विकास समन्वय (साविस) मार्फत कार्यवाही करण्यात येईल. |
| | | **अ.** | आवश्यक सर्व अर्हताप्राप्त अपंगांचा रोजगार प्राप्त करण्याचा अधिकार राहील. राज्य शासनाचे विविध प्रशासकीय विभाग दिव्यांग व्यकतींकरिता उपलब्ध योजना व आरक्षणा अंतर्गत उपलब्ध जागा याची माहिती वेळोवेळी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करेल. |
| | | **आ.** | दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ चे कलम ३३ व ३४ चे आरक्षण तरतूदींनुसार [४% (चार) टक्के समांतर आरक्षण (parallel)] आरक्षण तरतूदीनुसार दिव्यांग व्यक्तींची शासकीय व निमशासकीय सेवेत नियमानुसार नियुक्ती करण्याबाबतची खात्री सर्व नियुक्ती प्राधिकारी करतील. यासाठी मागासवर्गीय कक्ष काटेकोरपणे आरक्षण निश्चितीबाबत कार्यवाही करेल. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ चे अंमल बजावणीकरिता सक्षम प्राधिकारी आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्याकडून आवश्यकतेनुसार प्रभावी अंमलबजावणीसाठी आरक्षणाबाबत पडताळणी करण्यात येईल. |
| ४. | (iii) | | **उद्योजकतेस प्रोत्साहन :-** स्वयंरोजगार आणि उद्योजकता हा रोजगाराचा उत्तम प्रकार आहे. असंघटित क्षेत्रात रोजगारनिर्मितीसाठी उदयोजकतेस प्रोत्साहन देणे हे दिशादर्शक यंत्र म्हणून कार्य करेल. शासनाचे उद्योग विभाग, कौशल्य विकास व स्वयंरोजगार विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तथा तत्सम विभागामार्फत खालील कार्यवाही करण्यात येईल. |
| | | **अ.** | दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी मदत म्हणून शासन कर्ज सुविधा व व्याजाच्या परतफेडीमध्ये अनुदान सुविधा समाविष्ट असणाऱ्या योजना व कार्यक्रम कार्यान्वित करेल. त्यांचा शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगाराच्या धोरणांमध्ये समावेश केला जाईल. |
| | | **आ.** | महाराष्ट्र राज्य अपंग वित्तीय व विकास महामंडळ (MSHFDC) हे दिव्यांग व्यक्तींच्या स्वयंरोजगार योजनेमध्ये निर्धारित संख्या पूर्ण करण्यासाठी शासनाला मदत करेल. याकरीता महाराष्ट्र राज्य अपंग वित्तीय व विकास महामंडळास (MSHFDC) पुरेसा निधी राज्य शासन उपलब्ध करुन देईल. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:34:13 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | **इ.** | राज्य शासन दिव्यांग हक्क कायदा २०१६ मधील कलम ३६ (सी) नुसार राज्य आणि स्थानिक संस्था दिव्यांग व्यक्ती उद्योजक यांना निवासी कार्यशाळा वा कारखाने उभारण्यासाठी प्राधान्याने व सवलतीच्या दरात आवश्यकतेनुसार जमीन उपलब्ध करून देईल. जेथे शासनाचे औद्योगिक समूह विकास वा विशिष्ट उद्योगासाठी विशेष राखीव क्षेत्र असेल तेथेही जमीन आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देईल. यासाठी सवलतीच्या दरात देण्यात येणाऱ्या शासकीय/निमशासकीय भूखंड देण्याच्या योजनेर्तगत दिव्यांग व्यक्तीसाठी ५ % आरक्षण समांतर असेल. |
| | | **ई.** | राज्य शासन दिव्यांग हक्क कायदा २०१६ मधील कलम ३७ (अ) नुसार शेतजमीन वाटप तथा निवास योजनेमध्ये (agricultural land & housing) दिव्यांगाना ५ % आरक्षण (समांतर) राहील. यामध्ये लक्षणीय (benchmark) दिव्यांगना असणाऱ्या महिलेंला प्राधान्य दिले जाईल. तसेच राज्य शासन दिव्यांग हक्क कायदा २०१६ मधील कलम ३७ (ब) नुसार दारिद्रय निर्मुलन तथा अन्य विकासात्मक योजनेमध्ये दिव्यांगाना ५ % आरक्षण (समांतर) ठेवील. |
| | | **उ.** | राज्य शासन दिव्यांग व्यक्तींकरीता अनुकूल अशा पोर्टलची निर्मिती करेल. हे पोर्टल शिक्षण, रोजगाराच्या संधी, विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन आणि विशिष्ट उद्योगात असलेल्या नोकऱ्यांसाठी कारखान्यांद्वारे प्रशिक्षण यासंबंधीची अद्यावत माहिती दिव्यांग व्यक्तींना देईल. |
| ५) | | | **दिव्यांग व्यक्तींना सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने पुनर्वसन सेवा :-**<br>राज्य शासनाचे गृहनिर्माण विभाग, नगरविकास विभाग, ग्रामविकास विभाग, महसूल व पुनर्वसन विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तथा तत्सम विभागामार्फत खालील कार्यवाही केली जाईल. |
| | (i) | | **सामुहिक निवास सुविधेची तरतुद :-** |
| | | | दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या दिव्यांगत्वाचे स्वरूप, वय, स्थान व कौटुंबिक परिस्थिती कशीही असली तरी अर्थपूर्ण जीवन जगायला लागते. कुटुंबात राहणाऱ्या बौध्दिक दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींच्या पालकांच्या निधनानंतर या व्यक्ती अधिक असुरक्षित बनतात. अशा दिव्यांग व्यक्तींना सामुहिक निवास वा गट निवास सुविधा पुरवण्यासाठी राज्य शासन दिव्यांग पुनर्वसन क्षेत्रात पर्याप्त अनुभव असलेल्या संस्थांना आवश्यकतेनुसार मदत करेल. |
| | | **अ.** | दिव्यांग व्यक्ती/मुले यांना त्यांचे संमतीशिवाय घरामधून बाहेर काढून टाकले जाणार नाही. त्यांच्या आईवडिलांनी वा त्यांच्या पालकांनी घेतलेले दिव्यांग व्यक्ती/मुलांकरीता चे दिर्घकालीन पुनर्वसनासाठीचे निर्णय दिव्यांग व्यक्ती/मुलांच्या सुरक्षिततेसाठी व त्यांना वारसाहक्काने मिळालेल्या संपत्तीच्या सुरक्षेसाठी असतील. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:34:25 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | **आ.** | शासन मानसिक दिव्यांगांसाठी (Autism, Intellectual disability, Specific learning disability, Mental Illness, Multiple disabilities) सामुहिक घरांच्या विकासासाठी व त्यांच्या कामकाजासाठी शासन किमान बांधकामविषयक दर्जा, आकार/मानके तयार करेल. ही मानके शासकीय, अनुदानित व खाजगी सर्व प्रकारच्या सामूहिक निवासास / समूह घरास लागू असतील. |
| | | **इ.** | शासन मानसिकदृष्टया दिव्यांग व्यक्तींकरीता शासकीय तसेच अशासकीय संस्थेच्या माध्यमातून कार्यक्रम आयोजित करण्यास प्रोत्साहन देईल. अशा प्रकारच्या कार्यक्रमाद्वारे मानसिकदृष्टया दिव्यांग व्यक्तींना व्यवसायिक व समुदयाचा आधार मिळून पालक मृत्यु पावल्यानंतरही त्यांचे जीवन जगणे सुकर होवून ते सामाजिक व आर्थिक दृष्टया सुरक्षित राहतील. |
| | | **ई.** | राज्य शासन दिव्यांग क्षेत्रात अनुभव असलेल्या प्रतिष्ठीत संस्थांना समुह निवासी सुविधांची निर्मिती करायला प्राधान्याने सवलतीच्या दरात जमीन उपलब्ध करुन देईल. |
| | | **उ.** | राज्य शासन मानसिक दिव्यांग व्यक्तींकरीता समूह निवास आणि त्याला संलग्न कार्यशाळेची निर्मिती करण्यासाठी विकास योजनांच्या नियमांमध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा करेल. उच्च चटई निर्देशांक असलेली जमीन भूखंड यासाठी उपलब्ध करून देण्यात गरजेनुसार व आवश्यकतेनुसार पुढाकार घेईल. |
| | | **ऊ.** | सर्व जिल्हयात जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रांचे बळकटीकरण केले जाईल. जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र संपूर्ण जिल्हयासाठी दिव्यांग पुनर्वसनाचा आराखडा तयार करेल आणि जिल्हाधिकारीव्दारे आराखडयाच्या अंमलबजावणीची निगराणी केली जाईल. |
| ५. | (ii) | | **काळजीवाहकांचे प्रशिक्षण :-** |
| | | | राज्य शासन काळजी वाहकांच्या नेमणुक होण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण कार्यक्रम यांचे आयोजन करताना आवश्यकतेनुसार विद्यमान समूह घरांना प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यास प्रोत्साहन देईल. |
| ५. | (iii) | | **उच्च आधाराची गरज असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना प्राधान्य देणे :-** |
| | | | राज्य शासन शासकीय निवासस्थाने अथवा राज्य शासनाच्या सहाय्याने कार्यरत समुह निवास यामध्ये निवासांचे वाटप करताना उच्च आधाराची गरज असलेल्या दिव्यांग व्यक्तींचा विचार प्राधान्याने इतर व्यक्तींच्या अगोदर करेन. |
| ६) | | | **दिव्यांगत्व प्रमाणपत्र आणि आरोग्य विमा :-**<br>यासंदर्भात राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तथा तत्सम विभागामार्फत कार्यवाही केली जाईल. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:34:38 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | **अ.** | राज्य शासन दिव्यांगत्व प्रमाणपत्र त्वरीत व अधिक गतीने देण्यासाठी सद्यस्थितीत प्रमाणपत्रे देणारे प्राधिकारी यांच्याशिवाय अतिरिक्त प्राधिकारी यांना हे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार प्रदान करेल. संगणकाद्वारे प्रमाणपत्र मिळण्याची पद्धती म्हणजे SADM सिस्टीमद्वारे (दिव्यांगत्वाच्या परीक्षणासाठी असलेले सॉफ्टवेअर) प्रमाणपत्र देण्याची पद्धती तात्पुरती सुरूच राहील आणि ती आधारकार्डशी संलग्न होऊन वैश्विक ओळख पत्र/ Univerasal Disability of ID (UDID) कडे हस्तांतरीत करण्यात येईल. |
| | | **आ.** | दिव्यांगत्व प्रमाणपत्र किंवा त्याचे नुतनीकरण यासाठी दिव्यांग व्यक्ती व त्यांच्या सोबत त्यांच्या पालकाचा प्रवास, निवास व भोजन यासंबंधी झालेला सर्व खर्च वा खर्चाचा परतावा दिव्यांग व्यक्तीकरीता असणाऱ्या स्थानिक संस्थांकडून दिव्यांग व्यक्ती कल्याण योजनेतून आवश्यकतेनुसार करण्यात येईल. |
| | | **इ.** | शाळेत वा शालापूर्व शिक्षणासाठी जाणारी दिव्यांग मुले जर ती राष्ट्रीय न्यासाद्वारे राबविण्यात येणाऱ्या किंवा स्वावलंबन योजनेंतर्गत मोफत आरोग्य विमा योजनेसाठी पात्र असतील तर अशा मुलांचा समावेश मोफत वैद्यकीय विमा योजनेत केला जाईल. जर ही मुले या वा अन्य योजनेंतर्गत फायदा घेऊ शकत नसतील तर राज्य आरोग्य विमा योजनेस त्यांच्या वार्षिक हप्त्याचे प्रिमियम स्वतंत्रपणे भरण्याची व्यवस्था आवश्यकते नुसार करावी करेल. |
| (७) | | | **अडथळामुक्त वातावरण, सुगम्यतेचा अधिकार :-** सर्व शासकीय इमारती, सार्वजनिक सेवा, माहिती व संदेशवहन सेवा, वाहतूक सेवा दिव्यांग व्यक्तींकरीता सहजरित्या सुलभ संचार करण्याच्या दृष्टीने, सुरक्षितता, प्रवेश व वास्तविकता तत्त्वांनुसार टप्प्याटप्प्याने पुर्नबांधणी बांधकाम करुन आवश्यकतेनुसार सुगम्य बनवल्या जातील. |
| | | **अ.** | या संदर्भात मुख्यत्वे राज्यचे सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर विकास विभाग, ग्रामविकास विभाग, सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, माहिती तंत्रज्ञान विभाग, माहिती व जनसंपर्क यासह शासनाच्या सर्व विभागामार्फत आवश्यक कार्यवाही केली जाईल. ज्या ठिकाणी जुन्या इमारतींमध्ये बदल करणे, सुधारणा करणे व त्या दिव्यांग व्यक्तींसाठी प्रवेश करण्यासाठी सुलभ करता येणे शक्य नसते अशा इमारतींच्या बाबतीत संबंधित विभाग दिव्यांग व्यक्तींकरीता मदत करण्यासाठी सोबती/मदतनीस/सहाय्यक याची आवश्यकतेनुसार सोय करेल. |
| | | **आ.** | सर्व शासकीय विभाग व स्थानिक स्वराज्य संस्था खात्रीपुर्वक त्यांनी प्रसिध्द केलेली प्रकाशने, सूचना, घोषणा दिव्यांग व्यक्तींकरीता सहज व सुलभ उपलब्ध होतील यामध्ये रोजगाराच्या संधीविषयक माहिती, सार्वजनिक आरोग्यविषयक माहिती, आपत्कालीन संकटाकरीता करावयाची पूर्वतयारी याची माहिती आणि पर्यावरणविषयक माहिती यांचा समावेश राहिल. |
| | | **इ.** | राज्य शासन शहरी तसेच ग्रामीण भागातील दिव्यांग व्यक्तीसाठी सहज व परवडणारे माहिती व संदेशवहनाचे तंत्रज्ञान उपलब्ध होण्याच्या दृष्टीने योजना तयार करेल. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:34:51 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | ई. | राज्य शासन/स्थानिक स्वराज्य संस्था वाहतुक व्यवस्था सुगम्य भारत अभियानाच्या निकषाप्रमाणे करेल. |
| | | उ. | सर्व शासकीय/सार्वजनिक स्थानिक स्वराज्य संस्था उपक्रमांचे संकेतस्थळ सुगम्यतांचा निकषा प्रमाणे केली जाईल. |
| | | ऊ. | सर्व सार्वजनिक शौचालये अडथळे मुक्त केली जातील. |
| ८) | | | **साधने आणि उपकरणे , सहाय्यक साधने व त्यांची काळजी व देखभाल :-** |
| | | | राज्यशासन भारत सरकार व राज्यशासनाच्या विविध विभागाच्या योजनांतर्गत व्यक्तिगत गतिशिलता, कृत्रिम अवयव, सहाय्यक उपकरणे, संप्रेषण, संवाद आणि चलनवलन क्रिया यासाठी दिव्यांग व्यक्तींना आवश्यक सहाय्यक साधने व उपकरणे पुरवेल. प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला या योजनांतर्गत एकाच वेळी एकाच प्रकारची दोन साधने मिळणार नाहीत, याची दक्षता घेईल.<br>राज्य शासन सर्वसमावेशक पुनर्वसनाच्या पॅकेजला प्रोत्साहन देईल ज्यामध्ये साधने आणि उपकरणे यांचे वाटपाची काळजी घेतली जाईल तसेच पुर्नवसन विषयक सुविधा व उपचारात्मक काळजी व साधने, उपकरणे वाटल्यानंतरचे प्रशिक्षण यांचा समावेश करण्यात येईल. |
| ९) | | | **कायदेशीर क्षमता व पालकत्त्व :-** |
| | | अ. | राज्य शासन राष्ट्रीय न्यास कायदा १९९९ अंतर्गत कायदेशीर पालकत्व देईल. कायदेशीर पालकत्वासाठी आलेल्या अर्जाची प्रक्रिया वेळोवेळी जिल्हाधिकारी यांच्याद्वारे नियुक्त स्थानिक पातळीवरील समितीद्वारे केली जाईल. |
| | | आ. | विविध संस्थांमधील बेघर दिव्यांगांच्या अधिकारांचा इतरांप्रमाणे समान सन्मान केला जाईल. शाळेतील समावेशन, कौशल्य विकास व रोजगार यामध्ये त्यांना अग्रक्रम दिला जाईल. |
| १०) | | | **स्वसमर्थन आणि दिव्यांग व्यक्ती संघटना :-** |
| | | अ. | हे सार्वत्रिकरित्या स्विकारल्या गेले आहे की दिव्यांग व्यक्ती, दिव्यांग व्यक्तींच्या संघटना आणि बौध्दिक दिव्यांगत्व असलेल्या मुलांचे पालक यांना दिव्यांग व्यक्तींच्या गरजा, आवश्यकता यांचे समर्थन करण्याच्या, त्या समजून घेण्याच्या उत्तम क्षमता असतात. तसेच दिव्यांग अधिकार कुठे डावलले जातात हे दिव्यांग व्यक्तीच चांगल्या प्रकारे निदर्शनास आणू शकतात. त्यामुळे राज्य दिव्यांग व्यक्तींच्या संघटनांची निर्मिती करून त्यांना जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि योजनांच्या अंमलबजावणीसाठी त्यावर दक्षतेने लक्ष ठेवण्यास त्यांना तयार करेल. |
| | | आ. | दिव्यांग व्यक्तींच्या संस्थांना प्रोत्साहन दिले जाईल. त्यांना विशिष्ट दिव्यांग व्यक्तींना विशेष अशा सेवा पुरवण्यास प्रेरित केले जाईल ज्यामुळे त्याचा दूरगामी परिणाम म्हणून त्या विशिष्ट दिव्यांग व्यक्तीला समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वेगळे व्हावे लागणार नाही. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:35:03 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | **इ.** | मानसिक दिव्यांग व्यक्तींच्या संस्थांना निवासी कार्यशाळा, समुह घरे / सामूहिक निवास किंवा पुनर्वसन केंद्र सुरू करण्यास प्रोत्साहन दिले जाईल. तसेच मानसिक दिव्यांग व्यक्तींमध्ये नागरीक म्हणून त्यांचे अधिकार, जबाबदाऱ्या, दैनंदिन जीवनात त्यांची निवड आणि त्यांच्याविरुध्द होणाऱ्या बेकायदेशीर घटना याविषयी स्वयं जागृती निर्माण करण्यासाठी स्वसमर्थन कार्यक्रम राबवण्याची व्यवस्था करण्यास त्यांना तयार केले जाईल. |
| | | **ई.** | दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा २०१६ अंतर्गत अशासकीय संस्थांची, दिव्यांग मुलांच्या पालक संस्थांची नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने अर्ज प्राप्त झाल्यापासून ३ महिन्यात केली जाऊन या संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र दिले जाईल. दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा २०१६ च्या कलम ५० अन्वये नोंदणीचे नुतनीकरण ६० दिवसात दिले जाईल. |
| ११) | | | **उच्च आधाराची गरज असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींचे बाबतीत विशेष तरतूदी आणि प्रत्यक्ष लाभ बँक खात्यात थेट जमा होण्याची योजना :-** |
| | | | अधिक मदतीची गरज असणारे दिव्यांग व्यक्ती म्हणजे अशा व्यक्ती ज्या त्यांच्या दिव्यांगत्वाच्या स्वरुपामुळे अभिवृत्तीविषयक, हालचालविषयक, वर्तनविषयक, किंवा स्थानिय अडथळ्यांमुळे कुटुंबापासून किंवा समाजापासून बहिष्कृत, दुर्लक्षित, वेगळ्या किंवा सोडून दिलेल्या परितक्त्या किंवा संस्थेत राहणाऱ्या, गरजू, बेघर किंवा अनाथ असतात. उदाहरणार्थ राष्ट्रीय न्यास कायद्यान्वये ज्यांना तीव्र ते अतितीव्र दिव्यांगत्व आहे ते या प्रवर्गामध्ये समाविष्ट होतात. त्याचप्रमाणे इतर प्रवर्गातील दिव्यांग अनाथ, विशेष काळजी घेण्याची व सुरक्षिततेची गरज असलेले दिव्यांग व्यक्ती अधिक मदतीची गरज असणाऱ्या दिव्यांग व्यक्ती असतात. उच्च आधाराची गरज असणाऱ्या दिव्यांग व्यक्ती दिव्यांग हक्क कायदा २०१६ मधील कलम ३८ नुसार केंद्र शासनाने विहीत केलेल्या निर्धारण मंडळाव्दारे सुनिश्चित केले जातील. |
| | | **अ.** | राज्य अशी योजना तयार करेल जी उच्च आधाराची गरज असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींच्या पालकांच्या आर्थिक स्थितीनुसार वाजवी निर्वाहभत्ता देईल. प्रभावित उच्च आधाराची गरज असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण योजनेंतर्गत निवृत्तीवेतन दिले जाईल. या व्यतिरिक्त शासन अस्तित्वात असलेल्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करेल. उदा. संजय गांधी निराधार योजना, श्रवणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती योजना इत्यादी व उच्च आधाराची गरज असणाऱ्या दिव्यांग व्यक्ती कोणत्या आहेत हे विस्तृत परीक्षणाद्वारे व केंद्र व राज्य शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार निश्चित केले जाईल. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:35:17 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | **आ.** | दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या कोणत्याही कल्याण योजनेची अंमलबजावणी करताना उच्च आधाराची गरज असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. |
| १२) | | | **औदयोगिक सामाजिक जबाबदारी :-** (Corporate Social Responsibility) |
| | | **अ.** | महाराष्ट्र हे एक औद्योगिक राज्य आहे. मुंबई हे शहर महाराष्ट्र राज्य आणि संपूर्ण देशाची आर्थिक राजधानी आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रे स्वत: ची औद्योगिक सामाजिक जबाबदारी (CSR) म्हणून दिव्यांग क्षेत्रात विविध प्रकल्प सुरू करून या दिव्यांगाना सहाय्य करू शकतील. |
| | | **आ.** | राज्य शासन दिव्यांग व्यक्तींच्या कार्यशाळेस तसेच बौध्दिक दिव्यांगत्व असलेल्या मुलांच्या पालकांच्या संस्था यांनी तयार केलेल्या उत्पादनांना कायमचे ग्राहक मिळवून देण्याच्या कार्यास प्रोत्साहन देईल. |
| | | **इ.** | राज्य शासन पालकांच्या संस्था आणि उद्योजक यांनी सहयोगाने कार्य करण्यास परवानगी देईल. पालकसंस्था आणि उद्योजक यांनी एकत्र येऊन उत्पादनाचे डिझाईन करणे, किंमतीनुसार उत्तम उत्पादने, विपणनासाठी (मार्केटींग) मदत आणि विक्री इत्यादी कामे सामुदायिकरित्या करण्यास मदत करेल. |
| | | **ई.** | राज्य शासन दिव्यांग व्यक्तींसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबवेल ज्याद्वारे दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या गावात, शहरात स्थानिक कार्यात सामावून घेतले जाईल. |
| | | **उ.** | अशासकीय संस्थांना त्यांच्या भविष्यातील विकासासाठी व पोषणासाठी त्यांच्या क्षमता विकसनास सहाय्य करेल. |
| | | **ऊ.** | राज्य शासन उद्योजकांना राज्यात आयोजित केले जाणारे दिव्यांगासाठी विविध जनजागृती कार्यक्रम, किंवा इतर उपक्रमांना आर्थिक मदत करण्यासाठी प्रोत्साहित करेल. |
| १३) | | | **सामाजिक संरक्षण :-** |
| | | | सर्व दिव्यांग व्यक्तींना स्वतःसाठी व कुटुंबासाठी अन्नसुरक्षा, निवारा, निवास व्यवस्था, सामाजिक काळजी या संदर्भात सुरक्षित आणि यथायोग्य राहणीमानाचा अंतर्भाव असलेला सामाजिक संरक्षणाचा हक्क असायलाच हवा. त्यामुळे राज्याच्या या धोरणामध्ये खालील बाबींचा अंतर्भाव असेल. |
| | | **अ.** | दुर्लक्षित दिव्यांग, बेघर दिव्यांग किंवा निष्कासित दिव्यांग अशा मुलांना अनुदानित विशेष शाळांमध्ये, सामुहिक घर यामध्ये जीवन जगता यावे म्हणून प्रवेशास अग्रक्रम देण्यात येइल. |
| | | **ब.** | राज्य शासनाच्या सर्व विकासात्मक व दारिद्रय निर्मुलनाच्या विविध योजना, तथा कार्यक्रमांमध्ये दिव्यांग व्यक्तींना दयावयाच्या सहाय्याचे प्रमाण इतर लाभार्थ्यांना दयावयाच्या सहाय्याच्या प्रमाणापेक्षा २५ टक्के इतके ज्यादाचे राहिल. |
| | | **क.** | दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ प्रमाणे शासन खालीलप्रमाणे उपाय योजना करेल. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:35:32 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अ. दिव्यांगाना शासनाच्या अकृषिक जमिनी वाटप संबंधी योजना व संबंधित सर्व निवासी योजना व विकास कार्यक्रमामध्ये ५ % आरक्षण दिले जाईल व त्यामध्ये लक्षणीय दिव्यांगत्व असणाऱ्या महिलांना प्राधान्य दिले जाईल.<br>ब. शासनाच्या दारिद्रय निर्मुलनाच्या कार्यान्वीत योजनांमध्ये तसेच विविध विकास योजनांमध्ये दिव्यांगाना ५ % आरक्षण राहील आणि त्यामध्ये लक्षणीय दिव्यांगत्व असणाऱ्या महिलांना प्राधान्य देण्यात येईल.<br>क. ज्या जमिनी शासनाच्या विविध योजनामार्फत गृहनिर्माण प्रकल्प, निवारागृह, व्यवसायाची उभारणी, उत्पादन केंद्र, पुर्ननिर्मीती केंद्र आणि लघुउपक्रम यासाठी सवलतीच्या दरामध्ये दिल्या जातात, अशा योजनांच्या सवलतीच्या दरातील जमिन वाटपामध्ये दिव्यांगाना ५ % आरक्षण राहील. त्यामध्ये लक्षणीय दिव्यांगत्व असणाऱ्या महिलांना प्राधान्य देण्यात येईल. |
| | | ड | दिव्यांग व्यक्ती हक्क कायदा २०१६ मधील कलम ३४ प्रमाणे दिव्यांगाना शासकीय व निमशासकीय सेवेमध्ये एकूण पदाच्या प्रमाणात सर्व श्रेणीमधील पदांमध्ये ४ टक्के समांतर आरक्षण राहील. |
| १४) | | | **खेळ, करमणूक आणि सांस्कृतिक कार्यक्रम :-** |
| | | | राज्य शासनाने दिव्यांग व्यक्तींना खेळ, संस्कृती, करमणूक, अभ्यासपुरक व अभ्यासेतर कार्यक्रमात सहभागी होण्यास प्रोत्साहित करेल व त्यांना सामाजिक एकात्मता व पुनर्वसनाचा प्रमुख दर्शक मानल्यामुळे खालील बाबी होतील. या संदर्भात राज्याचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,सांस्कृतिक कार्य विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तथा तत्सम विभागामार्फत आवश्यक ती कार्यवाही केली जाईल. |
| | | **अ.** | दिव्यांग व्यक्तींच्या खेळांची गरज ओळखू शकतील अशा खेळ शिक्षकांची सेवा व खेळासाठी प्रशिक्षणाची सुविधा पुरविणे. |
| | | **आ.** | राज्य क्रिडा संस्थेमध्ये दिव्यांग व्यक्तीच्या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक व खेळ शिक्षकांच्या सोई करणे. |
| | | **इ.** | दिव्यांग व्यक्तींकरीता सुगम अशा सांस्कृतिक व कला विषयांच्या अभ्यासक्रमांची पुनर्रचना करणे, दिव्यांग व्यक्तींसाठी संगीत, नृत्य, नाट्य आणि भाषा या क्षेत्रांमध्ये राज्य व जिल्हा स्तरावर व राष्ट्रीय स्तरावर त्यांच्या सहभागासाठी प्रेरीत करणाऱ्या निश्चित अशा कार्यक्रमांचे आयोजन करणे. |
| | | **ई.** | दिव्यांग व्यक्तींकरीता करमणूकीचे कार्यक्रम आणि खेळ यामध्ये समावेश करण्यासाठी अत्यावश्यक बहुसांवेदिक घटकांचा समावेश करणे. |
| | | **उ.** | सांस्कृतिक, वैज्ञानिक, भौगोलिक आणि नैसर्गिक पर्यटनस्थळी दिव्यांग व्यक्तींना आवश्यक अनुभव देण्यासाठी उन्हाळी शिबीरे, स्थळभेटी यांचे आयोजन करणे. दिव्यांग व्यक्तींना संबंधित सभांना, सम्मेलनांना जाण्यासाठी त्यांच्या स्थळभेटीस प्रवास व निवासासाठी निधी उपलब्ध करून देणे. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:35:45 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| १५) | | | **दिव्यांग मुली व स्त्रियांसाठी विशेष तरतूदी :-** |
| | | | दिव्यांग मुली व दिव्यांग स्त्रिया दोन प्रकारे असुरक्षित असतात. त्यांच्यावर घरात वा घराबाहेर अन्याय होऊ शकतो, म्हणून राज्याच्या धोरणात त्यांच्यासाठी खालील विशेष तरतूदी केल्या गेल्या आहेत. या संदर्भांत राज्याचे महिला व बाल विकास विभाग, गृह विभाग व तत्सम विभागामार्फत आवश्यक कार्यवाही केली जाईल. |
| | | **अ.** | राज्य धोरण म्हणून दिव्यांग मुली व दिव्यांग स्त्रिया व त्यांच्या कुटुंबांना स्त्रियांना कुटुंबात, घरात लपवणे, घराबाहेर काढणे, दुर्लक्ष करणे, वेगळे काढणे हे टाळण्यासाठी संपूर्ण माहिती आणि मदतसेवा त्यांच्या कुटुंबाना प्रदान करेल. |
| | | **आ.** | राज्य शासन दिव्यांग मुली व दिव्यांग स्त्रियांच्या आवश्यतेनुसार निवास व एकट्या दिव्यांग मातेला जादा प्रसूती रजा, लवचिक कामाचे तास, त्यांच्या बाळांसाठी व मुलांसाठी पाळणाघरे, काळजीवाहक इत्यादी मदत सेवा पुरविल. |
| | | **इ.** | घर, शासकीय संस्था, सर्व कामाची ठिकाणे, शासनाने दिलेले निवास इत्यादी सर्व ठिकाणी शोषण, अपमानजनक वागणूक, गैरवर्तन, मारहाण, शारीरिक, मानसिक, लैंगिक आणि भावनात्मक हिंसा सर्व बाबतीत दिव्यांग मुली व स्त्रियांना विशेष संरक्षण आणि पोलिस तक्रार नोंदवण्यात अग्रक्रम दिला जाईल. |
| | | **ई.** | दिव्यांगत्व असलेल्या महिलांचे त्यांचे अधिकार व कर्तव्याच्या बाबतीत सबलीकरण केले जाईल. (सबलीकरण म्हणजे स्वतःच्या क्षमता ओळखणे व विकसित करणे, आपले ज्ञान व शक्ती विषयी इतरांशी बोलणे/ इतरांना माहिती देणे.) |
| | | **उ.** | राज्य शासन शोषण, गैरवर्तन, मारहाण याबाबत दिव्यांग महिला व दिव्यांग मुलींच्या तक्रारीं साठी सुगम्य, सुरक्षित व गुप्त/खाजगी तक्रार यंत्रणा उभारेल. |
| | | **ऊ.** | राज्य शासन शोषण, गैरवर्तन, कोणत्याही प्रकारच्या हिंसा याने पिडित दिव्यांग महिला व मुलींसाठी सुरक्षा, समुपदेशन आणि मदत सेवा पुरविल. |
| | | **ए.** | राज्य शासन दिव्यांग महिलांशी लग्नासाठी स्वतंत्रपणे व संपूर्ण सहमतीने तयार होणाऱ्या व्यक्तीस आर्थिक मदत देईल. |
| | | **ऐ.** | राज्य शासन दिव्यांग महिलांना त्यांचा गर्भधारणेचा हक्क बजावण्यास परवानगी आणि त्यांच्या परवानगी शिवाय त्यांना गर्भपात किंवा गर्भधारणा होऊ नये यासाठी मदत करेल. |
| | | **ओ.** | राज्य शासन दिव्यांग महिलांना त्यांच्या मातृत्वाचा हक्क आणि कुटुंबनियोजन याबाबत स्वतः व स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास तयार करणे. |
| १६) | | | **नियोजन व अंदाजपत्रकीय तरतूद :-** |
| | (i) | | **५ टक्के अंदाजपत्रकाचा उपयोग /विनियोग : -** |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:35:57 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | **अ.** | स्थानिक स्वराज्य संस्था आणि जिल्हा नियोजन समिती त्यांचे अधिनस्थ असलेल्या निधीतुन कमीत कमी ५ टक्के इतका निधी दिव्यांगासाठी राखीव ठेवेल व निर्धारित करेल. या ५ टक्के राखीव निधीपैकी किमान ५० टक्के निधी अतितीव्र दिव्यांग व्यक्ती, बौध्दीक दिव्यांग व्यक्ती व उच्च आधार असणाऱ्या या दिव्यांग व्यक्ती यांच्या योजनांकरिता वापरला जाईल. जसे शिघ्र निदान व काळजी, शिक्षण यामध्ये विशेष शिक्षण, कौशल्य विकास, रोजगार, जनजागृती निर्माण करणे, पुनर्वसन, सक्षमीकरण आणि दिव्यांग व्यक्तीचा सामाजिक व आर्थिक मुख्य प्रवाहामध्ये समाविष्ठ करणे योजना. |
| | | **आ.** | शासनाचे विविध विभाग दिव्यांगाच्या योजना/ कार्यक्रमासाठी पुरेशी तरतुद करेल. दिव्यांग कल्याण आयुक्तालय सक्षम तज्ञ व्यक्तीची मदत घेवून विविध विभागांनी दिव्यांग व्यक्तींच्या योजनेकरिता निश्चितपणे वाटप करण्यात आलेल्या तरतुदी व उपयोगिता व वार्षिक अंदाजपत्रकात वाटप केलेल्या निधीचा आढावा घेईल. |
| | | **इ.** | आयुक्त, दिव्यांग कल्याण हे नियोजित तरतुदीनुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचा पाठपुरावा करतील. |
| | (ii) | | **दिव्यांग जनांसाठी आंतरविभागीय योजना राबवणे /परीक्षण :-** |
| | | **अ.** | दिव्यांग कल्याण आयुक्त राष्ट्रीय बालस्वास्थ्य कल्याण कार्यक्रम, सर्व शिक्षा अभियान, दिव्यांग मुलांचे कल्याण, / ICDS, म्हाडा योजनेंतर्गत वाटप, सुगम्य भारत/Accessibility India/ NRUHM, दिव्यांग पेन्शन /समाज कल्याण, महिला व बाल कल्याण विभागांतर्गत योजना आणि इतर आंतरविभागीय योजना या सर्वाचे एककेंद्राभिमुखतेसाठी (Convergence) आराखडा तयार करतील. |
| | | **आ.** | जेथे शक्य होईल तेथे साधनांचे वाटप, शिष्यवृत्ती, निवृत्तीवेतन अणि भत्ते यांच्या वाटपासाठी प्रत्यक्ष हस्तांतर लाभ यंत्रणेचा (Direct Benefit Transfer) DBT) उपयोग केला जाईल. अधिक मदतीची गरज असलेल्या दिव्यांग मुलांना प्राधान्य दिले जाईल. या सर्व योजना ऑनलाईन पद्धतीने अखेरपर्यंत (End to End) राबवल्या जातील. |
| १७) | | | **संनियंत्रणाची पद्धती :-** |
| | | **अ.** | दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम ६६ मधील तरतुदी अन्वये सर्व धोरणात्मक कामासाठी राज्य सल्लागार बोर्ड नेमला जाईल. तो होईपर्यंत राज्य समन्वय समिती व राज्य कार्यकारी समिती धोरणात्मक कामे करतील. |
| | | **आ.** | दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा २०१६ अंतर्गत राज्य, जिल्हा समन्वय समिती आणि नॅशनल ट्रस्ट कायदा १९९९ अंतर्गत स्थानिक स्तर समिती प्रत्येक जिल्ह्यात स्थापन करेल. त्याचबरोबर उपजिल्हाधिकारी स्तराचा जिल्हा स्तरावर कार्य करणारा एक अधिकारी जिल्हास्तरावर नियुक्त केला जाईल. तो या समितींचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी मदत करेल. तसेच या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पंचायत राज संस्थांशी आणि नागरी स्थानिक संस्थांशी सर्वस्तरावर समन्वय साधेल. हा अधिकारी दिव्यांग कल्याण आयुक्तांना त्या जिल्ह्यासाठी सहाय्यक अधिकारी म्हणून मदत करेल. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:36:10 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | **इ.** | दिव्यांग व्यक्तींच्या विकासासाठी राज्य शासन दिव्यांग व्यक्ती विकास निर्देशांक निर्मिती करेल आणि दिव्यांग व्यक्ती विकास मार्गदर्शिका तयार करेल. याचा समावेश राज्याच्या मानवी विकास अहवालात केला जाईल. |
| | | **ई.** | राज्याच्या मुख्यमंत्र्याच्या अधिपत्याखाली एक संनियंत्रण समिती नियुक्त केली जाईल. ही समिती या धोरणाच्या अंमलबजावणीची देखरेख करेल. या समितीची वर्षातून किमान एक तरी सभा होईल. |
| | | **उ.** | या धोरणाच्या अधिसुचनेपासून सहा महिन्यात राज्य शासन सर्व विभागांच्या दिव्यांग कल्याण व पुनर्वसन साठीच्या योजना/कार्यक्रम/निधी यामध्ये सांगड घालण्यासाठी दिशा निर्देश करुन अंमलात आणेल. |
| १८) | | | **योजनांच्या नियोजन व संनियत्रण करण्याच्या दृष्टीने आवश्यक आधारभूत माहिती**<br>दिव्यांग व्यक्तींना सेवा प्रदान करण्याच्या दृष्टीने व दिव्यांग व्यक्तींच्या योजनांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने अचुक व निरंतर सुधारणा करण्यात आलेली माहिती अत्यंत महत्वाची ठरते. आज दिनांकापर्यंत विविध अभियान व योजनांद्वारे दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या अखत्यारितील विभागांनी आपल्या यंत्रणा विकसित करून अद्यावत करून कार्यान्वित केल्या आहेत. (राज्य शासनाचे आरोग्य अभियान, दिव्यांग व्यक्तींना वैश्विक ओळखपत्र, एकात्मिक बाल विकास योजना ,शालेय पूर्व शिक्षण, सर्व शिक्षा अभियान / प्राथमिक शिक्षण, राष्ट्रीय कौशल्य विकास परिषद / कामगार आणि कौशल्य बांधणी, राज्य उपजीविका अभियान, राष्ट्रीय न्यास / राज्य स्थानिक स्तर समिती आणि पालकत्व भारतीय पुर्नवास परिषदेकडील व्यवसायिकांची नोंदणी आरोग्य विमा योजना इत्यादी.)<br>दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे कार्यालय नोंदणीकृत अनुदानित / विना अनुदानित विशेष शाळा व दिव्यांग व्यक्तींना सेवा देणाऱ्या संस्थाची माहिती संकलित करुन एकत्रित करेल. ज्याद्वारे एकत्रित माहितीच्या व्यवस्थापनाच्या पध्दतीचा वापर करून, सर्व समावेशक सुचनाफलकाद्वारे विश्लेषण करून अहवालाची निर्मिती किमान खालील मुद्यांच्या बाबतीत करता येईल.<br>१. राज्यातील ग्राम पातळीपर्यंतच्या सर्व दिव्यांग व्यक्तींची यादी, सदर यादी मध्ये दिव्यांगत्वाचा प्रकार व टक्केवारी बाबतची माहिती.<br>२. दिव्यांग व्यक्तींना सेवा पुरविणाऱ्या यंत्रणांची यादी.<br>३. योजनानिहाय दिव्यांग लाभार्थ्यांची यादी.<br>४. दिव्यांग व्यक्तींना देण्यात येणाऱ्या लाभांचे स्वरूप व प्रमाण.<br>५. तरतुद, खर्च आणि विविध राज्य / केंद्र शासनाच्या अपंगाकरीता असणाऱ्या योजनांची कामगिरी यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांनी व जिल्हा नियोजन व विकास यंत्रणांनी बंधनकारकरित्या करावयाचा ५ टक्के निधी वरील खर्च.<br>सर्व पातळीवर नियोजन करणाऱ्या अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांना व्यवस्थापन माहिती यंत्रणेचा वापर एक प्रभावी साधन म्हणून करता येईल. याद्वारे दिव्यांग |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:36:23 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| | | | लाभार्थींना थेट लाभ देण्यामध्ये सहाय्य करता येईल व आंतरविभागाच्या योजनांमध्ये परिणाम कारकता आढळून येईल. याद्वारे एकत्रित माहितीच्या पध्दतीचे नियोजन करुन किमान खालील उद्दिष्ट साध्य करता येतील.<br>१. सर्व प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींकरिता सेवांची उपलब्धता नसलेले राज्यातील जिल्हे व तालुके यांना अधोरेखित करता येईल.<br>२. सर्व समावेशक शिक्षण देण्याच्या दृष्टीने व विशेष स्त्रोताची मदत घेण्याच्या दृष्टीने विशेष शाळांची व सर्व शिक्षण अभियानाची माहिती एकत्रित ठेवता येईल.<br>३. कायद्याच्या कलम १६ (VII) द्वारे दिव्यांग विदयार्थ्यांचे प्राथमिक शिक्षणाची क्षमता, त्यांचा सहभागावर नियंत्रण ठेवता येईल.<br>४. दिव्यांग व्यक्तीकरिताच्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीविषयक माहिती संकलित करता येईल. ज्यामुळे एकाच योजनेचा लाभ दुबार देणे टाळता येईल व लाभार्थ्यांच्या खात्यात थेट रक्कम प्रदान करण्याची पध्दत प्रोत्साहीत करता येईल.<br>५. कलम १७ अ अनुसार शाळेत जाणा-या दिव्यांग मुलाचे सर्वेक्षण करुन शाळेत जाण्याची त्यांची विशेष गरज व तीव्रता माहित करुन घेता येईल.<br>६. कलम २२ (२) नुसार रोजगाराची आवश्यकता असणा-या दिव्यांग व्यक्तींची नोंद ठेवणे.<br>७. कलम १९ (२) नुसार दिव्यांग व्यक्तींनी कौशल्य बांधणी व स्वयंरोजगार यामध्ये केलेला प्रगतीविषयक विखुरलेली माहिती एकत्रित ठेवणे.<br>८. कलम २५ (२) (अ) नुसार दिव्यांगत्व येण्याची कारणे शोधण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण हाती घेणे<br>९. कलम २५ (२) (क) नुसार सर्व मुलांची वर्षातून एकदा संभाव्य दिव्यांगत्व येण्याचे ओळखण्याच्या दृष्टीने चाळणी करणे.<br>१०. दिव्यांग व्यक्तीं व त्यांच्या कुटुंबांना भौगोलिक स्थानानुसार विविध प्रकारच्या उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती होण्याच्या दृष्टीने दिव्यांग व्यक्तींना सहज वापरता येईल अशा ॲपचा विकास करण्यात येईल. ज्यामुळे मार्गदर्शन व सल्ला याच्या सुविधा देखील पुरविता येतील.<br>धोरणाच्या मार्गदर्शिकेविषयक अधिसुचना प्रसिध्द झाल्यापासून ३ महिन्याच्या आत दिव्यांग कल्याण आयुक्तालय सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन तो राज्य शासनाकडे आवश्यक त्या मान्यतेसाठी सादर करेल. सदरील प्रकल्पामध्ये खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक राहिल.<br>अ) सदरील माहितीचे एकत्रीकरण, पडताळणी आणि प्रमाणीकरण हे प्रचलित वैज्ञानिक सर्वेक्षण पध्दतीद्वारे करावे.<br>आ) माहितीची सत्य असत्यता पडताळण्याच्या दृष्टीने बाह्य तज्ञ यंत्रणेकडून नमुना सर्वेक्षण करुन घेणे. |

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:36:40 +05'30'

इ) विभागाकडील माहिती अथवा इतर यंत्रणेकडील माहिती एक संघ ठेवून एकत्रीकरण करणे आणि सदरील माहिती दिव्यांग क्षेत्रात काम करणा-यांना उपलब्ध करुन देणे.

ई) माहितीची व्यवस्थापन प्रणाली स्पष्ट, साधी, समजण्यास सोपी व सुचना फलकासह (Dashboard) सुसज्ज असावी. सदरील माहिती पाहण्याचे, वाचनाचे व बदल करण्याचे अधिकार योग्य त्या स्तरावर असावेत.

**<u>शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांशी आंतरविभागीय सांगड:-</u>**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम,२०१६ या कायदयानुसार दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना तसेच सेवा देणे बंधनकारक करण्यांत आले आहे. अशा प्रकारच्या सेवा शासनाच्या विविध विभाग तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या कार्यकक्षेत येतात. त्या सोबतच शासनातील कायदे, नियम तसेच धोरण यांच्यावर राष्ट्रीय योजना आधारीत असतात. त्यामध्ये सुध्दा दिव्यांग व्यक्तींसाठी सुयोग्य तरतूदी केल्या आहेत.

दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या या आंतर विभागीय कार्यक्रम तथा योजनाचा प्रभावीपणा वाढविण्यासाठी वेगवेगळया विभागांची सांगड घालणे आवश्यक आहे. उदा.राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, जिल्हा शिघ्र हस्तक्षेप व निदान केंद्र, सर्व शिक्षा अभियान, एकात्मिक बाल विकास योजना, स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास आराखडा, वाहतुक विभाग, पंतप्रधान रोजगार योजना इत्यादि. अशा विविध विभागाकडून राबविण्यांत येणाऱ्या विविध कार्यक्रमांची सांगड घालण्यासाठी राज्य सरकार पुढाकार घेऊन खालील बाबी सुनिश्चित करेल-

अ) दिव्यांग व्यक्तींसाठी संबंधित विभागांची तसेच अर्थसंकल्पांतर्गत तरतूदी मध्ये प्राधान्यक्रम निश्चित करणे.

आ) अपंगांच्या सोयीसुविधांसाठी जिथे आवश्यक असेल तिथे योजनेत बदल प्रस्तावित करणे.

इ) तसेच विविध विभागांना त्यांच्याकडील अपंगांसाठी असलेल्या योजनेत बदल किंवा सुधारणा करण्यासाठी मदत करणे.

ई) विविध विभागामार्फत राबविण्यांत येणाऱ्या योजनांचे दुबारीकरण टाळणे.

उ) तसेच महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित यांनी कर्ज मंजूरी, निधी वितरण, कर्जाची परतफेड या सर्व बाबीचा दर्जा वाढविण्यासाठी कोअर बँकिग सारखी ऑनलाईन प्रणाली विकसीत करणे. या प्रणालीव्दारे क्षेत्रिय अधिकाऱ्यांना कर्ज परत फेडीसाठी पाठपुरावा करण्यासाठी वेळेवर सूचना निर्गमीत होईल.

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:36:53 +05'30'

| | | | |
|---|---|---|---|
| १९) | | | **राज्य दिव्यांग कल्याण आयुक्त कार्यालय :-** |
| | | | राज्य शासन दिव्यांग कल्याण आयुक्त म्हणून एका वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती करेल. राज्य आयुक्ताला दिव्यांग हक्क कायदा २०१६ च्या कलम ८० ते ८५ (अ) नुसार जबाबदारी व अधिकार असतील. |
| २०) | | | दिव्यांग हक्क कायदा २०१६ या धोरणांतर्गत विहीत केलेल्या विविध योजना/कार्यक्रम याची आखणी राज्य शासनाचे संबंधीत विभाग करतील व त्यासाठी त्यांचे विभागाच्या अंदाजपत्रकात( Budget) पुरेशी तरतुद करतील. |

* * * * *

Digitally signed by Dinesh Tarachand Waghmare
Date: 2019.02.21 13:37:07 +05'30'